# NOTICE FOR EXPRESSION OF INTEREST

Government Polytechnic, Sadar, Nagpur invites proposal from registered, bonafide & experienced catering firms for running of mess located at Boy’s hostel of Government Polytechnic, Sadar, Nagpur The terms & conditions for running the mess are available at Boy’s hostel, office, Government Polytechnic, Nagpur during working hours.

Expression of interest should be submitted in sealed cover along with copies of licenses from statutory bodies like food & drugs administration, collector of District Certificate from organisations where the firms have run/ running the Mess. A demand draft or Rs.500/- as processing fee should also be submitted. This amount is non refundable.

The last date of submitting expression of interest is (29/05/2017) till 5 pm.

**Principal,**
**Government Polytechnic, Nagpur**

Copy on :- 1) Institute Website.
2) Institute/ Hostel Notice board.

# शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर

## मुलांच्या वसतीगृहातील भोजनगृह (Mess) चालविण्याचे कामाकरिता अटी व शर्ती :-

१. मुलांचे वसतीगृहात अंदाजित १८० विदयार्थी असुन त्यांच्या दोन्ही वेळच्या जेवणाची व सकाळच्या चहा नाश्ताची (वैकल्पिक) सोय करावी लागेल.

२. आवेदन करणा-या ठेकेदाराकडे अन्न व औषध प्राधिकरण व जिल्हाधिका-यांकडून भोजनगृह (मेस) चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे.

३. संस्थेमार्फत भोजनगृह चालविणा-यास इमारत, विज व पाणी नि: शुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच भोजनगृहातील फर्निचर व इतर वस्तू त्यांच्या वापरात देण्यात येतील.

४. संस्थेने उपलब्ध करुन दिलेल्या वस्तुंव्यतिरिक्त इतर भांडयांची व फर्निचर व्यवस्था ठेकेदारास करावी लागेल.

५. भोजनगृहातील सर्व पदार्थांची व सेवेची गुणवत्ता (Quality) तपासण्याकरीता वसतीगृह समन्वय समिती राहील. हया समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

६. अन्न व औषध प्राधिकरण त्यांचेकडून तपासणी झाल्यास त्यानुसार कार्यवाही करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. कोणत्याही कायदयाचा किंवा नियमांचा भंग झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

७. भोजनगृहात बाल व वैद्यकीयदृष्टया अपात्र कामगार ठेवता येणार नाही. भोजनगृह व जवळचा परिसर स्वच्छ ठेवणे, व कामगारांचे कपडे स्वच्छ ठेवणे ठेकेदारास बंधनकारक राहील. तसेच कामगारांना एकाच प्रकारचे गणवेष स्वखर्चाने दयावे लागतील.

८. भोजनगृहातील सेवकांची संपुर्ण माहिती संस्थेला लेखी स्वरुपात दयावी लागेल. तसेच कोणताही सेवक सेवा सोडून गेल्यास व नविन सेवक नेमल्यास त्याची माहिती देणे बंधनकारक राहील.

९. भोजनगृहात पानबिडी, सिगारेट, तंबाखु, गुटखा, मादक पदार्थ ठेवण्यास मनाई राहील. तसेच ठेकेदार व त्याचे कर्मचारी हयांना वरील पदार्थांचे सेवन करण्यास मनाई राहील. भोजनगृहात कुठलेही बेशिस्त व अशोभनीय कृत्य होऊ न देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१०. समन्वय समिती किंवा त्यामधील सदस्य भोजनगृहातील खादयपदार्थांची गुणवत्ता व प्रमाण व स्वच्छतेबाबत आढावा घेईल. या समितीला किंवा सदस्याला संपुर्ण सहकार्य करणे व त्यांनी दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करणे ठेकेदारास बंधनकारक राहील. विदयार्थ्यांकडून मेस संबंधीत प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी ही समिती करेल.

११. भोजनगृहाचा वापर कुठल्याही परिस्थितीत निवासाकरीता करता येणार नाही. तसेच कोणतीही व्यावसायिक उत्पादने व कंपनीची जाहीरात करण्यात मनाई राहील.

१२. भोजनगृहात कोणत्याही प्रकारचे प्राणी वा पक्षी पाळता येणार नाही.

१३. ठेकेदारास करारमुदती पुर्वी भोजनगृह बंद करावयाचे असल्यास किमान ४० दिवसाची पुर्वसुचना लेखी दयावी लागेल. अशा परिस्थितीत सुरक्षाठेव परत होणार नाही.

१४. भोजनगृह ठेकेदारास चालविण्यास देण्यापुर्वी करारनामा करण्यात येईल. हा करार १० ते १२ महिन्याचा राहील. अटी व शर्तीचे पालन न झाल्यास भोजनगृह तात्काळ बंद करण्याचे संपुर्ण अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर हयांनी राखून ठेवलेले आहेत. भोजनगृह समाधानकारक चालविल्यास करारनाम्यास पुढील वर्षासाठी मुदतवाढ देण्याचे अधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर हयांचेकडे आरक्षित राहतील.

१५. ठेकेदारास प्रवेशित विदयार्थ्यांच्या भोजनासाठी रु.१४००/- प्रति विदयार्थी प्रति महिना व नाश्तासाठी रु.५००/- प्रति विदयार्थी प्रति महिना नाश्ता फक्त विकल्प देणा-या विदयार्थ्यां पोटी देण्यात येईल. दिवाळीत १५ दिवस व उन्हाळा २ महिने मेस बंद राहील

१६. स्वयंपाकासाठी लागणारा गॅस/ इंधन हयाचा संपुर्ण खर्च व व्यवस्था ठेकेदाराला करावी लागेल. संस्थेकडे एकूण ( सहा ) गॅस जोडण्या उपलब्ध आहेत.

१७. रु.५०,०००/- इतकी सुरक्षा ठेव संस्थेकडे बिनव्याजी ठेवावी लागेल.

१८. भोजनात खालीलप्रमाणे पदार्थ असणे आवश्यक आहे.

**सकाळचे भोजन** - १ ओली भाजी
१ सुकी भाजी/ उसळ
पोळया
भात / पुलाव
वरण/ दालफ्राय/ बेसन
दही/ ताक/ कठी
पापड/ लोणचे/ Salad

**रात्रीचे जेवण** - १ भाजी/ बेसन /दालफ्राय
पोळया
भात/ पुलाव/ वरण
पापड/ लोणचे/ सलाद / चटणी
दही/ ताक/ कठी

भाज्यांमध्ये विविधता असली पाहिजे व आठवडयातून १ दिवस सामिष पदार्थ (मटन, चिकन, फिश, अंडी) देणे अपेक्षित आहे.

**नाश्तातील पदार्थ** - साउथ इंडीयन पदार्थ किंवा पोहे आणि तत्सम व चहा/ कॉफी

१९. विदयार्थी प्रतिनिधी/ वॉर्डने हयांचेशी चर्चा करुन प्रत्येक महिन्याचा मेन्यू तयार करुन नोटीस बोर्डवर लावावा लागेल.

२०. भोजनगृहात लागणारे धान्य व तेल खालील दजाचे असणे बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| **गहू** | - | एम.पी.बोट (सरबती) |
| **तांदूळ** | - | चिन्नोर |
| **दाल** | - | यवतमाळ दाल (Unpolished) |
| **तेल** | - | चांगल्या ब्रॅंड चे Sunflower तेल |

वरील धान्य व तेलाचा किमान १५ दिवसाचा साठा करुन ठेवावा लागेल. खरेदी व साठा करतेवेळी विदयार्थी प्रतिनिधी व वॉर्डन/ कुलमंत्री हजर राहतील. रेडीमेड आटा वापरता येणार नाही.

२१. निविदा प्रक्रिया कुठल्याही टप्प्यावर थांबविणे, रद्य करणे, पुढे ढकलणे इत्यादी संबंधी सर्वाधिकार प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर हयांचेकडे आरक्षित राहतील.

**प्राचार्य,**
**शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर**

# आवेदन पत्र

प्रति,
मा. प्राचार्य
शासकीय तंत्र निकेतन,
नागपुर

विषय:— मुलांचे वसतिगृह शासकीय तंत्र निकेतन नागपुर येथील भोजनगृह ( मेस) चालविण्याबाबत.
संदर्भ:— भोजनगृह चालविण्या संदर्भात वर्तमान पत्र/संस्थेच्या वेबसाईटवरील प्रसिध्द झालेली जाहीरात.

महोदय,

आपल्याकडुन प्राप्त झालेल्या उपरोक्त संदर्भांकित जाहीरात व संबंधीत अटि व शर्थीच्या अधिन राहुन मी आपल्या संस्थेचे भोजनगृह ( मेस )चालविण्यास तयार आहे.
माझ्या कॅटरींग एजेन्सीचा तपशिल खालाल प्रमाणे आहे.

१) कॅटरिंग एजेन्सीचे नांव :—

२) कॅटरींग एजेन्सीच्या मालकाचे नांव,स्थायी पत्ता, आधार कार्ड क्र. व दुरध्वनी क्र. :—

३) कॅटरींग एजेन्सी रजिस्ट्रेशन नं./गुमास्ता नं. /अन्न व औषधी प्रशासन रजिस्ट्रेशन नं. :—

४) कॅटरिंगशी संबंधीत शैक्षणीक अर्हता धारण करित असल्यास तपशिल दयावा. :—

५) यापुर्वी/सद्य: परिस्थीतीत चालवित असलेला कॅटरींग एजेन्सीचा अनुभव :—

६) कॅटरींग संबंधीत उपलब्ध असलेल्या साहीत्याचा तपशिल :—

७) मनुष्यबळाची संख्या :—

८) देण्यात येणारी कॅटरींग सेवा :— स्वंयसेवा/टेबलसर्वीस

९) या व्यवसायासंबधी प्रलंबीत खटला/शिक्षा बददलची माहिती :—

१०) सदर प्रकारची सेवा या पुर्वी/सद्यापरिस्थितीत किती व कोणत्या प्रतिष्ठाणाकरिता देत आहे याबददलचा तपशिल :—

११) प्रति दिवस व्यवसायाचा टर्न ओव्हर :—

१२) पुरविण्यात येणा—या खाद्यपदार्थाचा तपशिल :—

१३) अटि व शर्थी मध्ये नमुद केलेली रू. १४००/— :—
प्रति विद्यार्थी प्रति महिना ( भोजनाकरिता ) व
रू. ५००/—प्रति विद्यार्थी प्रति महिना
(नाश्त्याकरिता वैकल्पिक) ही प्रतिपुर्तिची रक्कम
मान्य आहे कींवा नाही? ते लिहावे

१४) वरिल प्रतिपुर्ति रक्कम मान्य नसल्यास :—
भोजनाकरिता व नाश्त्याकरिता वेगवेगळी रक्कम
आपल्या तर्फे नमुद करावी.

मी निवेदन करतोकी, उपरोक्त संपुर्ण माहिती सत्य आहे. पुरविलेली माहिती खोटी आढळल्यास माझा अर्ज रदद होण्यास पात्र राहील.

आवेदकाची सही
नांव

दिनांक

टिपः— आधार कार्ड,संबधित परवाना पत्रे,अनुभव प्रमाणपत्रे, व कॅटरिंगशी संबंधित अर्हता प्रमाण पत्रे हयांच्या साक्षांकीत प्रतिलिपी सोबत जोडाव्या.